# महिलांचे हक्क : जमीन, जंगल, पाणी

## विभागवार बैठकांमध्ये झालेल्या चर्चांचा संक्षिप्त अहवाल

मार्च २०१६


स्त्री अभ्यास केंद्र,
आयएलएस् विधी महाविद्यालय

सोसायटी फॉर प्रमोटिंग पार्टीसिपेटीव्ह इकोसिस्टीम मॅनेजमेंट (सोपेकॉम)



अर्थसहाय्य

SWISSAID
Inspiring courage.

स्विसएड इंडिया, पुणे

# महिलांचे हक्क : जमीन, जंगल, पाणी

***विभागवार बैठकांमधे झालेल्या चर्चांचा संक्षिप्त अहवाल***

## प्रस्तावना

शेती मधील महिलांचे योगदान मोठे आहे. बहुतेक विकसनशील देशांमध्ये ६० ते ८० टक्के अन्नधान्य महिला पिकवतात असे दिसून येते. असे असले तरी प्रत्यक्ष जल, जंगल व जमिनीच्या हक्काम्ध्ये हे परावर्तीत होताना दिसत नाही. स्वतःच्या नावावर जमीन असणाऱ्या महिलांची संख्या फार कमी आहे. केवळ जमीनच नाही तर इतर संपत्तीमध्येही महिलांना बहुतेक वेळा हक्क नाकारला जातो. महाराष्ट्रातील परिस्थिती पहिली तर, २०११ च्या जणगणने नुसार एकूण शेतकऱ्यांपैकी ४०% तर एकूण शेती मजुरांपैकी ५०% महिला आहेत. परंतु २०१०-११ च्या कृषी जनगणनेनुसार जमिनीच्या मालकीच्या संदर्भातील माहिती पाहिली तर एकूण भूधारकांपैकी केवळ १५% महिला आहेत. आज कायद्याने महिलांना त्यांचे हक्क मिळण्याची सोय झाली असली, तरी प्रत्यक्षात मात्र तसे होताना दिसत नाही. महाराष्ट्रात अनेक संस्था/ संघटना महिलांच्या संपत्तीवरील हक्कांसाठी कार्य करत आहेत, परंतु इतर ठिकाणी त्याचा प्रचार आणि प्रसार होऊ शकलेला नाही.

ह्या पार्श्वभूमीवर स्त्री अभ्यास केंद्र; लॉ कॉलेज, आणि सोपेकॉम ह्यांनी महाराष्ट्रातील महिला आणि जल जंगल व जमिनीच्या हक्कावरील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी एक प्रकल्प हाती घेतला आहे. स्त्रिया-जल, जंगल व जमीन ह्या विषयावर काम करणाऱ्या महाराष्ट्रातील वेगवेगळ्या संस्था संघटनांबरोबर चर्चा करून त्यांच्या भागातील ह्या विषयासंबंधीचे प्रश्न समजून घेणे, आणि अशा चर्चा झाल्या नंतर त्यामधून समोर येणाऱ्या माहितीच्या आधारे एक राज्य पातळीवरील बैठक घेऊन महिलांच्या जल जंगल जमिनीवरील हक्काचा लढा पुढे नेण्याच्या दृष्टीने काय कृतीकार्यक्रम हाती घेता येईल ह्याबद्दल चर्चा करावी असा ह्या उपक्रमाचा उद्देश आहे. ह्या उपक्रमामध्ये महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांमध्ये एकूण ६ बैठका घेण्यात आल्या, आणि संस्था संघटनांच्या नेत्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. ह्या चर्चांमधून समोर आलेल्या प्रमुख मुद्यांची मांडणी ह्या अहवालामध्ये केली आहे.

## महाराष्ट्राची आकडेवारी

प्रत्यक्ष चर्चांमधून समोर आलेली माहिती मांडण्यापूर्वी आज जल जंगल जमीन-महिला ह्या संदर्भात महाराष्ट्रात काय चित्र दिसते आहे ह्याबद्दल थोडक्यात मांडणी केली आहे.

**तक्ता १ कामगारांच्या वर्गांप्रमाणे महिला आणि पुरुषांची टक्केवारी, २०११ ची जनगणना**




एकूण शेती करणाऱ्यांपैकी ४० टक्के तर एकूण शेतमजुरांपैकी ५० टक्के ह्या महिला आहेत. तसेच खालच्या ताक्त्यातून जे चित्र दिसते आहे त्याप्रमाणे एकूण पुरुष कामगारांपैकी शेती करणाऱ्या पुरुषांची टक्केवारी २३% तर शेतमजुरांची टक्केवारी ३०% आहे. पण हेच प्रमाण महिलांसाठी अनुक्रमे ३० आणि ४० एवढे जास्त आहे. शेती मध्ये असणारे महिलांचे हे योगदान जमिनीच्या मालकीमध्ये मात्र परावर्तीत झालेले दिसत नाही. २०१०-११ च्या कृषी गणने प्रमाणे राज्यातील भूधारक महिलांचे प्रमाण केवळ १५% आहे.

**तक्ता २ महिला आणि पुरुष कामगारांमध्ये कामगाराच्या वर्गांची टक्केवारी, २०११ ची जनगणना**



**तक्ता ३ महिला आणि पुरुष भूधारकांची टक्केवारी, २०१०-११ ची कृषीगणना**




पाणी जंगल घरठाण, व इतर अनेक साधनांच्या बाबतीत महिलांचे अधिकार दर्शवणारी माहिती संकलित केली जात नाही. महाराष्ट्रात जवळ जवळ ५००० पाणी वापर संस्था आहेत परंतु यामधील महिला सभासद किती अथवा त्या निर्णय प्रक्रियेच्या समितीवर आहेत व नाहीत अशी माहिती आपणास मिळत नाही. जमीन मालकीच्या बाबतीत देखील हक्क सोड पत्र किती केले जातात याची देखील कोठेही माहिती संकलित केली जाताना दिसत नाही. हि व अशा प्रकारची माहिती शासनास संकलित करून ती प्रसिद्ध करण्याची मागणी करावी लागेल.

## विभागवार चर्चांमधून समोर आलेले मुद्दे

विभागवार बैठकांमधून समोर आलेल्या मुद्यांमध्ये त्या विभागाशी निगडीत असणारे काही मुद्दे होते, तर काही मुद्यांवर सर्व ठिकाणी चर्चा झाली. विभागवार प्रश्नांचा विचार करायचा तर कोकणामध्ये झालेल्या चर्चांमध्ये आदिवासी समाजाचे जंगल, दळी जमिनी ह्यावरील हक्क, घरठाणावरील हक्क, कुळांचा प्रश्न, वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी सरकारकडून घेतली जाणारी जमीन आणि त्याचा उपजीविकेवर होणारा परिणाम, आणि त्याविरोधातील लढे हे मुद्दे प्रामुख्याने समोर आले. नंदुरबारमधील बैठकीमध्ये आदिवासी समाजाचा जंगलावरील अधिकार, त्यांच्या उपजीविकेचे प्रश्न, रोजगार हमी योजना आणि त्यातील अडचणी ह्या गोष्टींवर चर्चा झाली. मराठवाड्यामधे झालेल्या बैठकीत दलितांच्या जमीन हक्काचे प्रश्न, दुष्काळाचा प्रश्न, विधवा-परित्यक्ता स्त्रियांचे प्रश्न, भूमिहीन शेतमजुरांचे प्रश्न प्रामुख्याने समोर आले. तर विदर्भातील बैठकीमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा विषय प्रामुख्याने समोर आला. तसेच शेतीमालाला मिळणारा भाव व प्रतिष्ठा, शेतीचे वाढते बाजारीकरण व त्यामुळे शेतकर्याची होणारी पिळवणूक हे हि मांडण्यात आले.

त्याव्यतिरिक्त काही विषय जे सर्व बैठकांमध्ये चर्चिले गेले, त्याची थोडी अधिक तपशिलात पुढे मांडणी केली आहे.

## १. खाजगी मालमत्ता आणि त्यामध्ये स्त्रियांचा हक्क

सर्व चर्चांमधून हे प्रकर्षाने समोर आले की, शेतीमधील कामाचे बहुतेक ओझे महिला उचलतात. शेतीमधील बहुतेक सर्व कष्टाची, किचकट, वेळखाऊ कामे महिला करत असतात. ह्याउलट प्रत्यक्षात बाजारात जाऊन मालाची खरेदी-विक्री करणे बाजार स्मित्याम्ध्ये प्रतिनिधित्व करणे, निर्णय प्रक्रियेमध्ये भाग घेणे ह्यासारख्या कामांमध्ये मात्र महिलांचा सहभाग असत नाही. सिंचनाच्या कामामध्ये देखील महिलांचे कष्ट दिसून येतात परंतु कोणत्याही समित्यांवर त्यांची प्रभावी उपस्थिती दिसत नाही.

अनेक ठिकाणी जेथे पुरुष कामासाठी स्थलांतर करून गावाबाहेर जातात, महिला शेतीची सर्व जबाबदारी सांभाळतात.

जमिनीभोवतीच्या लढ्यांमध्येही (जसे की रायगडमधील सेझ विरोधातील लढा) महिला अग्रभागी असलेल्या दिसतात, कारण त्यांच्यामध्ये जमिनीकडे उपजीविकेचे साधन म्हणून पाहण्याचा दृष्टीकोन टिकून आहे. शेतीतील कष्टाच्या कामांचा भार सतत उचलल्याने महिलांना होणाऱ्या आरोग्याच्या समस्या ही चर्चेमधून समोर आल्या.

शेती मध्ये महिलांचा सहभाग मोठा असला तरी, महिलांच्या नावाने जमीन होणे किती दुरापास्त आहे हे ह्या चर्चांमधून समोर आले. हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, आणि पारसी समाजांमध्ये स्त्रियांच्या मालमत्तेवरील हक्कांसंबंधीचे व्यक्तिगत कायदे वेगळे आहेत. अनुभवावरून असे दिसते की मुलगी, आई, किंवा बहिण म्हणून फार क्वचित महिलांना त्यांच्या माहेरच्या मालमत्तेमध्ये हिस्सा मिळतो. बहुतेक वेळा त्या (स्वतःच्या खुशीने (?) किंवा दबावाखाली) मालमत्तेवरील, खास करून स्थावर मालमत्तेवरील आपला हक्क सोडून देतात. माहेरच्या वडिलोपार्जित जमिनीमध्ये हिंदू वारसा हक्क (२००५) कायद्यानुसार महिलांना त्यांच्या भावाच्या बरोबरीने हक्क मिळतो. प्रत्यक्षात सगळ्या ठिकाणी महिला त्यांचा हा हक्क सोडून देतात असे दिसून आले. त्यामुळे एक तर माहेरच्या कुटुंबाशी संबंध टिकवून ठेवण्यासाठी महिला स्वतःच हा हक्क सोडून देतात, किंवा त्यांना तसे करण्यासाठी कुटुंबाकडून दबाव आणला जातो. माहेरच्या संपत्तीत वाट मागण्याचा दबाव सासरकडून होत असल्याची देखील काही उदाहरणे देखील महिलांनी सांगितली. जमिनीच्या वाढ्त्या किमतींमुळे महिला हि जागृत होऊन हक्क सांगत असल्याची काही उदाहरणे दिसतात असे काही कार्यकर्त्यांचे म्हणणे होते. रेव्हेन्यू कोर्टात काही केसेस अनेक वर्षापसून चालू आहेत.

हिंदू धर्मातील स्त्रियांच्या बाबतीत जो कायदा लागू होतो तोच कुडा इतर धर्मातील कुटुंबासाठी देखील वापरला जातो असे अनेक जनंशी बोलताना लक्षात आले.

ह्याउलट विवाहित, विधवा आणि परित्यक्तामहिलांना आपल्या पतीच्या/ सासरच्या मालमत्तेमध्ये हिस्सा हवा असला तरी व्यवस्थेच्या आणि सांस्कृतिक अडचणींमुळे त्यांना ते शक्य होत नाही.सासरच्या कुटुंबाच्या मालमत्तेमधील हक्काचा मुद्दा आणखी वेगळा आहे. अनेक संस्था-संघटना राहते घर आणि जमीन पती-पत्नी दोघांच्या नावाने व्हावी, किंवा पतीच्या जमिनीमधील काही हिस्सा पत्नीच्या नावाने हस्तांतरित करावा ह्यासाठी प्रयत्न करत आहेत. परंतु, त्यामध्ये अनेकदा कायद्याचा पूर्ण विचार न करता, केवळ महिलेचे नाव ७/१२ च्या उताऱ्याला लावले जाते. अशा वेळी प्रत्यक्षात त्या महिलेला घर/जमिनीवर हक्क मिळत नाही, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

**विधवा आणि परित्यक्ता स्त्रियांच्या** सासरच्या जमिनीमधील हक्काचा प्रश्न सर्व बैठकांमध्ये मांडण्यात आला. परित्यक्ता महिलांना तो मिळविणे सामाजिक त्याबरोबरच कायदेशीर अडचणींमुळे अवघड असते. त्यासाठी त्यांना सासरच्या कुटुंबाबरोबर झगडा करावा लागतो. त्यामध्ये जर त्या महिलेला मुलगा नसेल, तर तिला जमीन मिळविणे आणखी अवघड होते. विदर्भामध्ये आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवांना जमिनीची मालकी, कर्जाची रक्कम इत्यादीची माहिती मिळविणे कठीण जाते असे दिसले.
कुटुंबाकडे संपत्तीमधील आपला हिस्सा मागणाऱ्या महिलांना अनेकदा हिंसाचाराला तोंड द्यावे लागते. उदाहरणार्थ कोकणातून समोर आलेल्या महितीप्रमाणे आदिवसी समाजामध्ये जमिनीमध्ये हक्क मागणाऱ्या विधवांना अनेकदा डाकीण ठरविले जाते, किंवा त्यांच्यावर दुसरे लग्न करण्यासाठी दबाव आणला जातो.
सर्व ठिकाणी झालेल्या चर्चांमधून कुटुंबाच्या खाजगी मालमत्तेमध्ये हक्क मिळविणे हे महिलांसाठी कठीण असून त्यासाठी सामाजिक, सांस्कृतिक, तसेच कायदेशीर अडचणी असतात हे समोर आले.

## २. सरकारी संसाधने आणि त्यावरील महिलांचा अधिकार

खाजगी मालमत्तेबरोबरच, खाजगी क्षेत्रात येणार नाहीत अशी संसाधने, आणि त्यावरील महिलांचा हक्क ह्याबद्दलही विभागावर बैठकांमध्ये बरीच चर्चा झाली. सरकार आणि भांडवलदारांपासून संसाधनाचा बचाव करण्याचा लढा मोठा आहे. अशा संसाधनांवर दलित, आदिवासी, मासेमार अशा समूहांचा हक्क मिळविण्यासाठी वेगवेगळ्या संस्था संघटना लढे देत आहेत. संस्था-संघटना अशा संसाधनांवर समूहांचा आणि समुहा मधील महिलांचा हक्क मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहेत. एका बाजूला संघटना त्या संसाधनांवर अवलंबून असणाऱ्या गटांकडे ती रहावीत ह्यासाठी सरकारबरोबर लढत आहेत. तर दुसऱ्या बाजूला ही संसाधने समूहांकडे समुहाचा हक्क म्हणून रहावीत आणि खाजगी/सार्वजनिक हक्कांमध्ये महिलांना समान हक्क मिळावा ह्यासाठी त्यांचा लढा चालू आहे.
हे हक्क मिळविण्यासाठी केल्या जाणाऱ्या लढ्यांमध्ये महिलांचा सहभाग सर्व ठिकाणी मोठा असल्याचे दिसते. ह्या चर्चांमधून समोर आलेले दोन प्रमुख मुद्दे होते

***जंगलावरील अधिकाराचा प्रश्न***

समूहांसाठी, खास करून आदिवासी समूहांसाठी जंगलावरील हक्क मिळविण्यासाठी संस्था-संघटना कार्यरत आहेत. हे हक्क मिळवत असताना त्यांना येणाऱ्या अडचणी अनेक आहेत. चर्चांमधून वैयक्तिक तसेच समूहाचे अधिकार, दावे दाखल करण्यासाठी लागणारी कागदपत्रे, हक्क सिद्ध करण्याची दावेदारावर असणारी जबाबदारी, जंगलांचे खाजगी क्षेत्राकडून हस्तगत केले जाणे इत्यादी मुद्दे समोर आले.
वनहक्क कायद्याप्रमाणे मिळणारे अधिकार हे इतर सरकारी जमिनींवरील अधिकारांप्रमाणेच पती-पत्नी दोघांच्या नावाने मिळणे अपेक्षित आहे. परंतु प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही.

***गायरान जमिनीचा प्रश्न***

मराठवाड्यातील संघटना अनेक वर्षांपासून दलित कुटुंब कसत असलेल्या गायरान जमिनी त्यांच्या नावाने करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यामध्ये येणाऱ्या अडचणी सामाजिक तसेच प्रशासकीय अशा दोन्ही पातळ्यांवरील आहेत. जमिनीवर हक्क मागणाऱ्या दलितांना हिंसाचाराला सामोरे जावे लागते. सध्या

गायरान जमीन रेग्यूलराईज करण्यासाठी केवळ शासन निर्णयाचा आधार आहे. परंतु तो पुरेसा नसून त्यासाठी कायदा होणे गरजेचे आहे अशी संघटनांची भूमिका आहे.

मराठवाड्यातील चर्चेत असे अनेक गट उपस्थित होते जे भटक्या विमुक्त समाजाबरोबर अथवा भूमिहीन कुटुंबाबरोबर काम करीत आहेत. जेथे जमीनच नाही तेथे महिलांचा हक्क कशा पद्धतीने प्रस्थापित करता येईल असा प्रश्न उपस्थित केला गेला. सरकारी अथवा इतर खाजगी जमिनीवर हक्क प्रस्थापित करता येतील का? मालकी नसल्यास इतर कोणत्या मार्गाने तो होऊ शकेल?

### ३. महिला शेती आणि उपजीविका ह्यासंबंधीचे वेगळे प्रयोग (collectives)

जमीन, शेती संबंधी प्रश्नांबरोबरच सर्व विभागांमधून महिला एकत्र येऊन उपजीविकेसाठी करत असलेले काही नवीन प्रयोगांची उदाहरणे समोर आली. कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा तीनही जिल्ह्यांमध्ये बचतगटाच्या महिला जमीन खंडाने घेऊन एकत्रितपणे कसत असल्याची उदाहरणे पाहायला मिळाली. आंबेजोगाई येथील काही महिला मागील १० वर्षांपासून सेंद्रिय भाजीपाला पिकवून आठवड्याच्या बाजारात त्याची एकत्रित विक्री करतात.

असे प्रयोग करत असताना महिलांना काय प्रकारच्या अडचणी येतात (जसे की कुटुंबाकडून होणारा विरोध, जमीन खंडाने घेत असताना येणाऱ्या अडचणी) आणि त्यांना काय प्रकरच्या सहाय्याची आवश्यकता असते, (प्रशिक्षणे, आर्थिक मदत, पाणी, मार्केट) ह्यादृष्टीने बैठकांमध्ये चर्चा झाली. तसेच अशा प्रकारच्या प्रयोगांची माहिती एकत्र करून त्याचे डॉक्युमेंटेशन केल्यास इतर ठिकाणी असे प्रयोग राबविण्यास मदत होऊ शकेल असा विचार पुढे आला.

विशेषतः भूमिहीन महिलांच्या संसाधनांवरील हक्कांचा आणि त्यांच्या उपजीविकेचा विचार करत असताना, अशा प्रकारचे प्रयोग महत्वाचे ठरतात.

### ४. पुढील दिशा: भविष्यातील कामाचा आराखडा

स्त्रियांच्या जमीन, जंगल, पाणी आणि उपजीविका ह्यावरील हक्कांबद्दल काम करणाऱ्या राज्य पातळीवरील एका नेटवर्क ची आवश्यकता हा सर्व चर्चांमध्ये एक विषय होता. ह्या बैठकांमध्ये सामील झालेल्या बहुतेक सर्व संघटनांचे स्वतःचे नेटवर्क असले तरी महिलांच्या ह्या प्रश्नांचा विचार करणारे एक राज्यपातळीवरील नेटवर्क असणे महत्वाचे आहे असे वाटले.

**मागण्या**

ह्या विषयावर पुढे काम करण्यासाठी काय करता येईल ह्याबद्दलच्या अनेक सूचना बैठकांमधून समोर आल्या. ह्या सूचनांची ढोबळ मानाने धोरणातील बदल, कृतीकार्यक्रम, क्षमता विकास आणि संशोधन अशा प्रकारे विभागणी करता येईल.

***सरकारकडे मागण्या***

ग्रामीण, गरीब, आदिवासी आणि दलित महिलांचा जमिनीवरील हक्क मिळविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या कायदेशीर आणि धोरणात्मक साहाय्याची आवश्यकता आहे. सरकारी जमिनी, वन हक्क कायद्याची अंमलबजावणी, गायरान जमिनींचे वितरण आणि व्यक्तिगत कायदे ज्याठिकाणी लागू होतात

अशी खाजगी मालमत्ता अशा दोन्ही बाबतीत हे लागू होते. महिला व पुरुष अशा सामुदायिक नावाने सरकारी जमिनींचे वाटप असावे असे मांडण्यात आले. सरकारी जमिनी फक्त महिलांच्याच नावाने असाव्यात असाही सूर चर्चेमध्ये दिसून आला.

त्याचबरोबर महिलांना कर्ज, किसान क्रेडीट कार्ड, कृषी उत्पन्न बाजार समिती व सदस्यत्व अशा गोष्टींचा लाभ मिळाला पाहिजे. एकत्रितपणे शेती करणाऱ्या महिलांच्या गटांना सहकार्य, आणि उत्पादनाच्या वाटणी मध्ये त्यांना योग्य तो हिस्सा मिळावा ह्यासाठी व्यवस्था असणे आवश्यक आहे.

विदर्भामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि शेतीमालाचा भाव हे प्रमुख प्रश्न आहेत. त्याठीकाणी स्वामिनाथन कमिशन रिपोर्ट ची अंमलबजावणी ही एक प्रमुख मागणी होती. आत्महत्याग्रस्त भागामध्ये विधवा महिलांच्या नावाने जमीन होण्यासाठी सर्व प्रकारचे सहाय असावे असे मांडण्यात आले.

महिला शेती मधे एवढ्या मोठ्या प्रमाणात सहभागी असून देखील सिंचन आणि पाणलोट विकासाच्या कार्यक्रमांमधे त्यांना सहभागी करून घेतले जात नाही. अशा उपक्रमांमध्ये महिलांच्या, आणि विशेषतः दलित आणि भूमिहीन महिलांच्या संसाधनावरील हक्कांचा विचार करणे गरजेचे आहे.

***समुपदेशन आणि क्षमता विकास***

विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये जेथे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण मोठे आहे, त्याठिकाणी समुपदेशन आणि महिला-पुरुष ज्याठिकाणी एकत्र संवाद साधू शकतील, आणि आपल्या समस्या मांडू शकतील अशी एखादी व्यवस्था असावी अशी मागणी समोर आली. विशेषतः महिलांना, ज्यांना आपल्या नवऱ्याच्या आत्महत्येमुळे धक्का बसला आहे, त्यांच्यासाठी समुपदेशन महत्वाचे आहे.

जमिनीवरील महिलांचे अधिकार, त्यासंबंधी कायद्यातील तरतुदी, तसेच जमीन, पाणी इत्यादी संबंधी कायदे आणि धोरणे, त्यामधील अडचणी ह्याची लिंगभावाच्या दृष्टीकोनातून माहिती इत्यादी विषयांवर कार्यकर्त्यांना प्रशिक्षणे मिळण्याची आवश्यकता सर्व बैठकांमधे व्यक्त करण्यात आली.

संघटनांशी जोडल्या गेलेल्या वकिलांना महिला आणि जमीन हक्कांसंबंधी प्रशिक्षणे मिळवीत

संघटनेच्या महिला कार्यकर्त्यांना त्यांच्याकडे येणाऱ्या महिलांच्या जमिनीसंबंधातील केसेस हाताळण्यासाठीचे प्रशिक्षण मिळावे (गुजराथ मधील WGWLO च्या धर्तीवर)

'हुंडा नको, जमीन द्या' असे कॅम्पेन चालू करावे

***माहितीचे संकलन आणि संशोधन***

महिलांसाठी उपयुक्त अशा शेतीशी संबंधित उपकरणांची माहिती शेतकरी महिलांपर्यंत पोहोचायला हवी

महाराष्ट्रातील जमीन, जंगल, पाणी ह्या संबंधी महिलांच्या गटांनी हाती घेतलेल्या उपक्रमांचे (women's collectives) डॉक्युमेंटेशन करणे

मुस्लीम महिलांच्या मालमत्तेवरील अधिकाराचा वेगळा विचार करण्याची आवश्यकता आहे. मुस्लीम महिला संघटनांमधे सहभागी आहेत, परंतु ह्या विषयावर वेगळे काम विशेष केले गेलेले नाही.

महिलांच्या संसाधनांवरील हक्कांसंबंधी सहभागी प्रक्रीयेमधून माहिती गोळा करण्याची गरज अनेक विभागातून मांडली गेली.

एकूणच खाजगी मालमत्ता मिळवताना प्रत्यक्षात काय घडते आहे याबाबत संशोधन करण्याची गरज टीम ला वाटली